प्रेसनोट

दिनांक - २९/०९/२०१८

---

**कुख्यात गुंडा कडुन तीन देशी बनावटीचे पिस्तोल,दहा काडतुससह एक लाख सात हजाराचा शस्त्रसाठा जप्त**

---

पुणे शहरात कोणत्याही प्रकारे अनुचित प्रकार घडुन सार्वजनिक शांतताभंग होवु नये म्हणुन पोलीस अभिलेखावरील सराईत गुंड व गुन्हेगार यांचे हालचालीवर लक्ष ठेवण्याबाबत व त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी आदेश दिलेले आहेत.

दिनाक – २८/०९/२०१८ रोजी संघटित गुन्हेगारी विरोधी पथक (पश्चिम) गुन्हे शाखा पुणे येथील अधिकारी व कर्मचारी कर्वेनगर कोथरुड पुणे या भागात गस्त घालत असताना पोलीस कर्मचारी कैलास सार्ळुके व अजय उत्तेकर यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की कुख्यात गुंड संतोष नातु रा -महषीनगर पुणे हा गुन्हेगारांना शस्त्रे पुरवितो तो त्याचेकडील पिस्तोल विक्री करण्यासाठी भुजबळ बंगला कर्वेनगर पुणे याठिकाणी येणार आहे. अशी खबर मिळाल्यावरुन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी तेथे सापळा लावुन संशयीत इसम संतोष विनायक नातु वय–४२ रा – ४४/३४५ महर्षीनगर झांबरे पॅलेससमोर चिंतामणी बिल्डिंग पुणे यास ताब्यात घेतले आहे. त्यावेळी त्याचे ताब्यात तीन देशी बनावटीचे पिस्तोल व दहा जिवंत काडतुस असा एक लाख सात हजार रुपयाचा शस्त्रसाठा मिळुन आलेला आहे.

संतोष नातु हा पोलीस अभिलेखावरील सराईत व नामचिन गुंड आहे. **यापुर्वी त्याचेकडुन गुन्हे शाखा येथील पोलीसांनी चौदा तसेच खडक व भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीसांनी प्रत्येकी एक अशी एकुण एकोणीस अग्नीशस्त्रे व सदोतीस काडतुसे जप्त करण्यात आलेली आहे.** त्याचेविरुध्द भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे येथे खुनाचा प्रयत्नाचा एक, अग्नीशस्त्र जवळ बाळगल्याचा एक, खडक पोलीस स्टेशन पुणे येथे गंभीर दुखापतीचा एक, अग्नीशस्त्र जवळ बाळगल्याचा एक , लष्कर पोलीस स्टेशन पुणे येथे दुखापतीचा एक, स्वारगेट पोलीस स्टेशन येथे अग्नीशस्त्र जवळ बाळगल्याचा एक असे **एकुण सहा गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहे.**

आरोपीने पिस्तोल व काडतुस त्याने कोठुन आणली आहेत ? त्याचेकडे अग्निशस्त्रे, काडतुस व घातक शस्त्राचा आणखी साठा आहे काय? अग्नीशस्राचा वापर त्याने गंभीर गुन्हा करण्यासाठी केला आहे काय? यापुर्वी अग्निशस्त्रे कोणाला विक्री करणार होता ? याबाबत पोलीस त्याचेकडे तपास करत आहेत.

मा. भारत एस. गायकवाड प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी तेरावे पुणे शहर यांचे न्यायालयात आरोपीस हजर करण्यात आले होते. सरकारी वकील श्रीमती वैशाली पाटील यांनी त्याची पोलीस कोठडी मिळण्याची मागणी केली होती. न्यायालयाने त्यास दिनांक - ०४/१०/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

सदरची कामगिरी गुन्हेशाखा, पुणे शहराचे श्री. समीर शेख स. पो. आ. गुन्हे - १ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली संघटित गुन्हेगारी विरोधी पथक पश्चिम विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. राम राजमाने, पोलीस उप निरीक्षक श्री. संजय गायकवाड, उत्तम बुदगुडे आणि पथकातील पोलीस कर्मचारी कैलास सांळुके, अजय उत्तेकर, विवेक जाधव, प्रविण पडवळ, सुनिल चिखले,राजेंद्रसिंह चौहान, विजय गुरव, किरण ठवरे,निलेश शिवतरे,रमेश चौधर,राकेश खुणवे, संभाजी गंगावणे यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक उत्तम बुदगुडे हे करत आहेत.

संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभाग,गुन्हेशाखा,पुणे शहर

पोलिस निरीक्षक
संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक पथक
पश्चिम विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर